—: प्रेसनोट :—

दि. १७/०२/२०२१

**यातील फिर्यादी यांचे शिधावाटप दुकानावर कायदेशीर कारवाई न करण्याकरीता प्रती महिना रु. ४०००/— याप्रमाणे मागील पाच महिन्यांचे एकुण रु. २०,०००/— लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा नोद.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद कमांक | ०८/२०२२ |
| कलम | ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | चंद्रशेखर झगाजी लोंढे, वय ५२ वर्षे, धंदा—नोकरी (सहाय्यक शिधावाटप तपासणी अधिकारी (वर्ग—३), शिधावाटप कार्यालय, ३५ ई सरोजिनी नायडु रोड, अशोक नगर, मुलुंड (पश्चिम), मुंबई—४०००८०. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. २०,०००/— |
| तडजोडीअंती स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. २०,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यांचे मुलुंड (पुर्व) येथे शासकिय शिधावाटप दुकान आहे. यातील आलोसे चंद्रशेखर झगाजी लोंढे, सहाय्यक शिधावाटप तपासणी अधिकारी यांनी फिर्यादी यांचे दुकानावर येवुन, त्यांच्या कार्यालयात तक्रारदार यांच्या दुकानातील शिधावाटपाबाबत तक्रार प्राप्त झाली असुन, तक्रारीचे अनुषंगाने दुकानावर कायदेशीर कारवाई करायची नसल्यास प्रती महिना रु. ४०००/— असे मागील पाच महिन्यांचे एकुण रु. २०,०००/— रक्कमेच्या लाचेची मागणी केली.<br><br>फिर्यादी यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, मुंबई कार्यालयात समक्ष हजर राहून आलोसे यांचे विरुध्द लेखी तक्रार केली.<br><br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १७/०२/२०२२ रोजी पंचासमक्ष तक्रारीची पडताळणी केली असता, आलोसे यांनी वरीलप्रमाणे लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडन रु. २०,०००/— लाचेची रक्कम स्विकारल्याने रंगेहात पकडण्यात आले. |

18/2/22

( संजीव भोळे )
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई विभाग, मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्ट्राचारा संबधीत काही माहिती असल्यास अशा लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ—acbmaharastra.gov.in
ईमेल— १)acbwebmail@mahapolice.gov.in
२)addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज—www.acbmaharastra.net.टोलफ्रि. क्र. १०६४
दुरध्वनीक्र. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००

Scanned with CamScanner